राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.४४/का.०५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २८ सप्टेंबर, २०१८

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

प्रति,
आयुक्त,
धुळे व अहमदनगर महानगरपालिका.

**विषय :- धुळे व अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१८ निवडणुकीची पूर्वतयारी.**

**संदर्भ :-** १) आयोगाचे पत्र क्र. रानिआ/ मनपा-२०१८/ प्र.क्र.४२/का.५, दि.२७/७/२०१८
२) आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१८/का.७, दि.२७/७/२०१८
३) आयोगाचे अ.शा. पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.२१/का.७, दि. ३०/७/२०१८

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही जबाबदारी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने डिसेंबर, २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या धुळे व अहमदनगर महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणुक वेळेवर घेण्यासाठी खालील प्रमाणे सूचना / आदेश दिलेले आहेत :-

(i) **महानगरपालिका हद्दीत बदल न करणेबाबत** - सचिव, राज्य निवडणूक आयोग यांनी प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग व प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना पाठविलेले अर्धशासकीय पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.२१/का.७, दि. ३० जुलै, २०१८

(ii) **प्रभाग रचनेबाबत** - आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.४२/का.५, दि.२७/७/२०१८

(iii) **मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाबाबत** - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१८/का-७,दिनांक २७ जुलै, २०१८ अन्वये दि.१ सप्टेंबर, २०१८ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभागून वापरावयाची आहे.

२. धुळे व अहमदनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत. मात्र मतदार यादी कार्यक्रम व प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम हा आयोगाकडून स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येईल.

३. **आदेश**

३.१ उपरोक्त निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी दक्षता व काळजी घेण्यात येते, ती सर्व दक्षता व काळजी या निवडणुकांमध्ये देखील घेणे बंधनकारक आहे. तरी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे. या निवडणुकांसाठी त्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

३.२ (अ) **प्रभाग रचनेपासून निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे** -

कर्तव्यदक्ष, निपःक्ष अधिकारी/कर्मचारी यांचा लौकिक व सचोटी पाहून नियुक्ती करावी. स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या दिनांकास ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावर ३ वर्ष पूर्ण होत असतील त्यांना निवडणुकीची कामे देण्यात येऊ नयेत. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल, संबंधित अधिकारी त्या जिल्ह्याचा रहिवाशी असू नये. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.३०/का-५, दि.३१ जुलै, २०१८ च्या आदेशान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ब) **अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत -**

(i) महानगरपालिका आयुक्त यांनी ३ व अपवादात्मक परिस्थितीत ४ प्रभागांकरिता १ याप्रमाणे उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

(ii) प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास १ याप्रमाणे तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ म्हणून व महानगरपालिकेतील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ व ३ म्हणून नियुक्ती करावी. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६ /का.५,दि.१२/३/२०१५)

(iii) निवडणुकांसाठी आवश्यक असलेले निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी इ. उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची आहे. त्याचबरोबर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नसल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त व विभागीय आयुक्त यांनी आपसात योग्य तो समन्वय साधून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल याची खात्री करुन कार्यवाही करावी. (आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का.५, दि.२६/१२/२०१६).

(iv) विभागीय आयुक्तांनी उपलब्ध करुन दिलेल्या अधिकाऱ्यांची महानगरपालिका आयुक्त, निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करतील. तसेच त्यांना योग्य ते प्रभाग नेमून देतील.

(v) महानगरपालिका क्षेत्रातील मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्रांसाठी पुरेसे अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात. यावेळी किमान १० टक्के कर्मचारीवृंद अधिक्याने नेमण्यात येईल याची काळजी घ्यावी. तसेच निवडणूक कामासाठी आवश्यक इतर कर्मचारीवृंद यांची

सेवा अधिग्रहित करावी. पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक पोलीस कर्मचारीवृंदाची नियुक्ती करण्याबाबत निदेशित करावे.

(vi) निवडणुकीचे काम करण्यासाठी आवश्यक ते अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२/०३/१९९५ तसेच शुध्दीपत्रक क्र.एसईसी/झेडपीपीएस/२०१७/प्र.क्र.४४/का-७, दि.१८/७/२०१८ अन्वये अधिग्रहित करण्यात याव्यात.

(vii) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर या अधिकारी /कर्मचाऱ्यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Disciplinary Action with Suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. तरी आयोगाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यांनी योग्य ती कार्यवाही करावी. (आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दि.०२/०८/२००६ )

**(क) अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत -**

महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व विषयावर योग्य ते प्रशिक्षण द्यावे. उदा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाची ओळख व जबाबदारीची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने सर्व कायदेशीर तरतुदी तसेच आयोगाच्या आदेशांबाबतची माहिती द्यावी. महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यिय प्रभाग पध्दती असल्याने प्रत्येक मतदारास ४, ५ अथवा ३ मते द्यावी लागतील. या सर्व बाबी विचारात घेऊन खालील नमूद विषयांबाबतचे विशेष प्रशिक्षण द्यावे :-

(i) बहुसदस्यीय प्रभागांमध्ये करावयाच्या मतदानाबाबत.

(ii) नामनिर्देशनपत्र व शपथपत्रांचे संगणकीकरण.

(iii) आयोगास विविध टप्प्यांवर द्यावयाच्या अहवालाची पध्दती
( संगणकीय प्रणाली, True Voter app, व्हॉटस् ॲप इ. चा वापर)

(iv) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकी दरम्यान आचारसंहिता भंगाबाबत होणाऱ्या घटनांवर लक्ष ठेवण्याकरीता नागरीक व निवडणूक यंत्रणा यांच्याकरीता COP (Citizen On Patrol) हे ॲप्लिकेशन तयार केले आहे. त्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.

(v) आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणीबाबत.

(vi) आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना.

(vii) पेड न्यूज, पेड सोशल कमेंट, सोशल मीडिया, इत्यादीवर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना.

(viii) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

(ix) मतदान केंद्राध्यक्ष व इतर अधिकाऱ्यांसह सर्वांना मतदान यंत्र हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण, इत्यादी.

**(ड) सर्व्हिस व्होटर्सना टपाली मतपत्रिका देणे -**

राज्य निवडणूक आयोगाने क्र. एसइसी/एमएनसी/सी.आर.२८/डी.५, दि.२५ मे, २०१८ च्या आदेशान्वये सर्व्हिस व्होटर्सना टपाली मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सर्व सर्व्हिस व्होटर्सना टपाली मतपत्रिका पाठविता येणे शक्य व्हावे यासाठी सर्व्हिस व्होटर्सचा रेकॉर्ड संबंधित रेकॉर्ड ऑफिसशी संपर्क साधून अद्ययावत करुन घेण्यात यावा. तसेच जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधून सर्व्हिस व्होटर्सची नावे व पत्ते उपलब्ध करुन घ्यावेत.

**(इ) मतदान टक्केवारी वाढविणे -**

(i) महानगरपालिकांच्या मागील निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी (धुळे-६१.४९ टक्के व अहमदनगर-७३.१२ टक्के) असल्याने यावेळी मतदानाची टक्केवारी वाढविण्याबरोबरच Ethical Voting म्हणजे निवडणुकीमधील नैतिकता वाढविण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांची मदत घेऊन

(उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, बँका, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् इत्यादी) मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा.उदा.पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मिडिया, इ.

(iii) आपल्या कार्यक्षेत्रातील सहकार विभाग, शाळा/महाविद्यालय, कृषी विभाग, इत्यादी शासकीय/निमशासकीय कार्यालये यांच्या समन्वयाने मतदार जागृतीची मोहिम राबविण्यात यावी.

४. मतदान प्रक्रिया :-

४.१ मतदान केंद्र निश्चितीबाबत -

(i) महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यिय प्रभाग पध्दती असल्याने, आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मतदान केंद्राचे स्थान तसेच मतदान केंद्रनिहाय मतदारांची संख्या निश्चित करावी.

(ii) प्रत्येक मतदान केंद्रास ७५० ते ८०० मतदार जोडण्यात यावेत.
(पत्र क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.०९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५,
पत्र क्र. रानिआ / मनपा-२०१६/ प्र.क्र.४/का.५, दि. ९ मार्च, २०१६,
आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६/का-५,दि.३ डिसेंबर, २०१६ )

४.२ (अ) आदर्श मतदान केंद्र -

(i) प्रत्येक मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पहाणी करणे.

(ii) सदर मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे. (उदा.सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत,इ.)

दिव्यांग व्यक्तींना मतदान करता येणे शक्य व्हावे यासाठी मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे आयोगाच्या क्र.रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७,दि.१८/२/२०१७ च्या पत्रातील सुचनांनुसार उचित दक्षता घेण्यात यावी.

(iii) आदर्श मतदान केंद्र तयार करण्याकामी नाविन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात व शक्यतो सर्व मतदान केंद्र ही त्या धर्तीवर तयार करण्यात यावीत.

**४.२ (ब) मतदान केंद्र आदर्श झाली आहेत किंवा नाही याची तपासणी त्रयस्थ संस्थमार्फत करणे. -**

(i) महानगरपालिका आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून शक्यतो स्थानिक एका चांगल्या त्रयस्थ संस्थेची निवड राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने करावी.(उदा.महाविद्यालय, स्वयंसेवी किंवा खाजगी संस्था इत्यादी.) व त्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे.

(ii) त्रयस्थ संस्थेने मतदानापूर्वी मतदान केंद्रांची पाहणी करुन त्यामध्ये काही सुधारणा आवश्यक असल्यास अथवा मतदान केंद्र योग्य ठिकाणी स्थलांतरीत करणे आवश्यक असल्यास तसा अहवाल महानगरपालिका आयुक्तांना द्यावा. या अहवालाच्या आधारे महानगरपालिका आयुक्तांनी आवश्यक सुधारणा कराव्यात.

(iii) त्रयस्थ संस्थेने अहवाल सादर करण्यासाठी त्यांना महानगरपालिका आयुक्तांनी एक प्रश्नावली तयार करुन द्यावी. त्रयस्थ संस्थेने मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रांना भेटी देऊन आपला अहवाल महानगरपालिकेस मतदानाच्या दिवसापासून १० दिवसात सादर करावा. उदाहरण म्हणून प्रश्नावली सोबत जोडली आहे. त्यामध्ये महानगरपालिका आयुक्तांनी योग्य व आवश्यक ते बदल करावेत.

(iv) त्रयस्थ संस्थेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेने त्यांचे विश्लेषण करुन त्याबाबतचा विश्लेषणात्मक अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.

## ४.३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व इतर साहित्याबाबत:-

(i) महानगरपालिकांच्या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे निवडणुका घेण्यासंदर्भात कार्यवाही करावी. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर मतदान केंद्रांच्या संख्येचा आढावा घेण्यात यावा. उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या माहितीसह निवडणुकीसाठी आवश्यक मतदान यंत्रांची संख्या व त्यासाठी लागणारे इतर साहित्य इ.बाबतची माहिती आयोगास ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी. जेणेकरुन मतदान यंत्र व इतर साहित्याची व्यवस्था वेळेत करण्यात येईल. तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुरक्षिततेसाठी सुस्थितीत असलेल्या स्ट्राँग रुमची व्यवस्था करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. (पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का-५,दि.१९/११/२०११). मार्कर पेन वापरण्यायोग्य आहेत याची आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

(iii) संबंधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना पितळी सील पुरवावेत.

## ४.४ मतमोजणी :-

(i) मतमोजणीकरीता राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/ मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५, दि. २१ डिसेंबर, २००९ व दि. २९ मार्च, २०१० तसेच आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२५/का-५, दि.१८ फेब्रुवारी,२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ii) मतमोजणीच्यावेळी अनावश्यक गर्दी / गोंधळ होणार नाही यासाठी योग्य ती उपाययोजना करावी. तसेच राज्य निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीत मतमोजणीची आकडेवारी भरणे आवश्यक असून

संगणक प्रणालीतूनच तयार होणारे विजयी उमेदवाराचे प्रमाणपत्र(Colour Print) काढल्यानंतरच निकाल घोषित करावा व प्रमाणपत्र सही करुन वितरण करावे.

(iii) निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या व काढता येणाऱ्या मेमरी मतमोजणीनंतर सुरक्षित, सीलबंद स्वरुपात ठेवण्यात याव्यात.

५. **आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी :-**

१) प्रभाग रचनेपासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना व इतर उपाययोजना करण्याबाबत आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.३०/का-५, दि.३१ जुलै, २०१८ च्या आदेशान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सर्व संबंधित विभागांनी सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच सर्व बाबींवर तार्किक (Logical) कार्यवाही प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून, यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून कोणत्याही लोकप्रतिनिधींना(मंत्री व राज्यमंत्रीसह) त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर स्वेच्छा निधीतून खर्च करता येणार नाही असे आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क., दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये आदेशित केले आहे. सदर आदेशातील सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

३) महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रामध्ये आचारसंहिता लागू राहील. निवडणुका असलेले महानगरपालिका क्षेत्र वगळता अन्य क्षेत्रात आचारसंहिता लागू नसल्यामुळे संबंधित जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये म्हणजेच त्या जिल्ह्यातील जिल्हापरिषद / पंचायत समिती, नगरपरिषद / नगरपंचायत वा इतर महानगरपालिका क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक

बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु निवडणुका असलेल्या महानगरपालिकेतील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४) आचारसंहितेचा कालावधी - राज्य निवडणूक आयोग ज्यावेळी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करेल त्यावेळेपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

५) आचारसंहितेबाबत आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का.६, दिनांक १४/१०/२०१६ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास महानगरपालिका आयुक्त यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मार्गदर्शनाकरिता राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे आचारसंहितेप्रकरणी परस्पर संदर्भ करु नये.

६) संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी निश्चित करुन त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

६. **खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे** - निवडणुकीसाठी आचारसंहिता कालावधीत मतदारांना प्रभावित करण्याकरिता तसेच प्रलोभन देण्यासाठी उमेदवारांकडून तसेच राजकीय पक्षांकडून नवनवीन क्लुप्त्यांचा वापर करण्यात येतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून ज्याप्रमाणे आचारसंहितेबाबत उपाययोजना करण्यात येतात. त्याचधर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दक्षता घेण्यात यावी.

६.१ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१२, दि. २ मे, २००८ अन्वये महानगरपालिका निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून सदरचे अधिकार आयोगाचे दि. ०५/०६/२०१० व दि.१० ऑगस्ट, २०१५ च्या आदेशान्वये संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार खर्चाचा हिशोब विहित रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना निरर्ह घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव विहित कालमर्यादेत विभागीय आयुक्त यांना सादर केला जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

६.२ उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ / मनपा-२०१६/प्र.क्र.४६/का.५, दि.३१ जानेवारी, २०१७ अन्वये विहित केल्यानुसार राहील.

६.३ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का.०६, दि.१०/०८/२०१५ व रानिआ/२०१६/उखनि/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि.१५ ऑक्टोबर, २०१६ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने दैनंदिन खर्चाचा हिशोब दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील तसेच राजकीय पक्षांनी निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाचा हिशोब २०/६० दिवसात संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा ते प्राधिकृत करतील अशा महानगरपालिका उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाचा हिशोब आयोगाने विकसित केलेल्या "ट्रू व्होटर" या अँड्रॉईड बेस मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून भरावयाचा आहे. सदरचे ॲप्लिकेशन प्ले स्टोअरवर व https://goo.gl/sx1Jek या लिंकवर उपलब्ध आहे. सदरचा खर्च हाताने (Manually) भरण्यास परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे ट्रु व्होटरच्या माध्यमातून खर्चाचा तपशील भरण्यासंदर्भात उमेदवार, राजकीय पक्ष व संबंधित कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी पुरेश्या संख्येने मास्टर ट्रेनर्स तयार करावेत.

६.४ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष,दि.१५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उमेदवारांनी तसेच राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केली आहे. उमेदवारांच्या तसेच राजकीय पक्षांनी केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्रांसंदर्भातील आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ-२०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष, दि.२५ ऑक्टोबर, २०१६ पहावेत.

६.५ राजकीय पक्षाने निवडणुकीदरम्यान उमेदवारांवर केलेल्या खर्चाबाबतची कागदपत्रे / विवरणपत्रे / शपथपत्रे इ. संदर्भातील आयोगाचे आदेश क्र. रानिआ / रापनों-२०१६/ प्र.क्र.०४/का.११, दि. २० ऑक्टोबर, २०१६ व आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ / २०१६/ उनिख/ प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष, दि. २५ ऑक्टोबर, २०१६ पहावेत. उपरोक्त सर्व तरतुदी व आदेश सर्व उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

६.६ निवडणुकीच्या कालावधीमध्ये निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याच्या कामामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी व इतर अधिकारी यांचे पूर्ण लक्ष केंद्रीत होत असल्याने त्यांना निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या बाबीकडे पुरेसे लक्ष पुरविता येत नाही. त्यामुळे उमेदवार व राजकीय पक्ष यांच्याकडून होणाऱ्या निवडणूक खर्चाच्या हिशोबावर लक्ष ठेवण्याकरिता उप जिल्हाधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दर्जाचा एक अधिकारी नियुक्त करण्यात यावा. हा अधिकारी उमेदवारांचे खर्चाचे हिशोब तपासण्याकरिता लेखाधिकारी (वर्ग-१) यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याचे तसेच इतर निवडणूक निर्णय अधिकारी व लेखा अधिकारी यांच्यामध्ये समन्वयाचे काम करेल. ज्या उमेदवारांचे खर्चाचे हिशोब संशयास्पद वाटतील अशा खर्चाच्या हिशोबांची तपासणी आयुक्त, महानगरपालिका यांनी निश्चित केलेल्या चार्टर्ड अकाऊंटट (CA) मार्फत करुन घेण्याची जबाबदारी त्याची राहील.

६.७ राजकीय पक्षांसाठी राज्य निवडणूक आयोगाने पारीत केलेल्या वेगवेगळ्या आदेशांमध्ये खालील बाबींची पूर्तता न करणाऱ्या पक्षांची नोंदणी रद्द करण्याची तरतूद आहे :-

(i) निवडणुकीच्या काळात आचारसंहितेचे निर्देश अथवा सूचनांची अवहेलना करणे.
( आदेश क्रमांक -एसईसी/२००९/सीआर-४९/का-११, दिनांक ३१ मार्च, २००९ )

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या विहित "वेळ व रितीने" सादर न करणे.
(आदेश क्रमांक- रानिआ-२०१६/ उनिख/ प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि.१५ ऑक्टोबर,२०१६ )

(iii) पाच वर्षांच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये अंतिमत: एकही उमेदवार उभा न करणे.(आदेश क्रमांक-रानिआ/रापनों-२०१८/प्र.क्र.८/का-११, दिनांक २५ जुलै, २०१८)

(iv) निवडणुकीमध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्यामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे.
(आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/रापनों-२०१८/प्र.क्र.८/का-११,
दिनांक २५ जुलै, २०१८)

**संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी राजकीय पक्षांची बैठक घेऊन वरील आदेशांतील सर्व तरतूदी त्यांच्या नजरेस आणाव्यात.**

**७. नामनिर्देशनपत्र, शपथपत्र व इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत**

७.१. उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र

(ब) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे आयोगाचे दि.१३/८/२०१८ च्या आदेशानुसार सुधारीत नमुन्यातील शपथपत्र

(क) आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती, व

(ड) पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्यास त्याबाबत "जोडपत्र-१" व "जोडपत्र-२"

(इ) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ( जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केल्याची पावती व हमीपत्र)

(ई) शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र

७.२. राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या दोन बाबींकरिता म्हणजेच उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशन पत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

७.३ सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ. भरण्यात अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक किंवा आवश्यकतेप्रमाणे त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाला पुरविण्यात आलेल्या पोलीस सुरक्षा व्यवस्थेमुळे इच्छूक उमेदवारांना मदत कक्षात जाण्यास अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील सेतू, ई-सेवा केंद्र इ. जास्त क्षमतेची इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी तसेच सायबर कॅफे व सी.एफ.सी. (Community Facilitation Centre) इ. ठिकाणी नामनिर्देशनपत्रे भरण्याची सोय उपलब्ध ठेवावी.

७.४ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र संगणकाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुन्यात भरुन त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वत:ची स्वाक्षरी करुन व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही. (क्र.रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का-०५, दि.८/१/२०१५)

७.५ राखीव प्रभागातून सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतूद आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.(सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१)

७.६ आवश्यक ती प्रमाणपत्रे व पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत पक्षाचा अध्यक्ष, सचिव किंवा सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने शाईचे अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेले "जोडपत्र-२" उमेदवाराने विहित मुदतीत सादर करावे. राजकीय पक्षांनी, विहित नमुन्यातील पक्षाचा अध्यक्ष / सचिव यांनी बॉलपेनने स्वाक्षरी केलेले, "जोडपत्र-१" विहित मुदतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे नमुने व जात वैधता प्रमाणपत्राकरिताचे हमीपत्र ही कागदपत्रे स्कॅन (Scan) करून अपलोड किंवा संगणकाच्या मदतीने भरू नये.

७.७ महानगरपालिका निवडणुकांकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या घरामध्ये शौचालय आहे व ते त्याचा नियमित वापर करीत आहेत इ. बाबतचे महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्याचे किंवा अशा व्यक्तीचे स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७.८ उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरीता असलेल्या माहिती पुस्तिकेतील विहित नमुन्यात घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलव्दारे देता येणार नाहीत.

७.९ नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्राचा नमुना खालील नमूद वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे:- https://panchayatelection.maharashtra.gov.in या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास महानगरपालिका आयुक्तांनी मार्गदर्शन करावे. त्यानंतरही अडचणी आल्यास आयोगाच्या संगणकीकरण शाखेतील नोडल अधिकारी व महाऑनलाईनचे प्रतिनिधी यांच्याशी दूरध्वनी व ई-मेल वर संपर्क साधावा.

**७.१० नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास :-**

आयोगाच्या क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६,दिनांक २७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. ५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

याबाबत सर्व राजकीय पक्षांना व उमेदवारांना लेखी सूचित करण्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी कराव्यात.

**७.११ नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-**

नामनिर्देशनपत्र भरण्याच्यावेळी अनेक उमेदवारांनी अर्ज भरुन देखील एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवार ज्यावेळी अर्ज मागे घेतात, त्यावेळी सदर उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे असे प्रसंग घडल्यास आयोगास सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/ का.०५, दिनांक २३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

७.१२ मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदारांना फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे. यासाठी संगणकीकृत मतदार यादी करताना व्होटर स्लिप तयार करावी. महानगरपालिकेतील सर्व मतदारांना १०० टक्के व्होटर स्लिपचे वाटप मतदानाच्या तारखेपूर्वी निश्चितपणे होईल याची खबरदारी महानगरपालिकेने घ्यावी.

८. आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना :-

८.१ महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी.

(i) या समितीमध्ये पुढीलप्रमाणे सदस्य असतील :-

| अनिवार्य सदस्य | आवश्यकतेप्रमाणे सदस्य |
|---|---|
| पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| आयकर विभागाचे अधिकारी | महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन परिषद, कार्यालय |
| विक्रीकर विभागाचे अधिकारी | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| अबकारी विभाग | विद्यापीठे |
| बँकेचे वरिष्ठ अधिकारी | महानगरपालिकेतील माहिती अधिकारी इ. |

(ii) या समितीवर आवश्यकतेप्रमाणे इतर अधिकारी घेण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

(iii) महानगरपालिका आयुक्त यांनी योग्य त्या अधिकाऱ्याची या समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करावी.

(iv) महानगरपालिकेची निवडणूक असलेल्या जिल्ह्यामध्ये महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधावा.

८.२ संबंधित तहसिलदार यांच्या स्तरावर एक समिती स्थापन करण्यात यावी. यामध्ये पुढील सदस्य असतील :-

i) संबंधित तहसिलदार, अध्यक्ष,

ii) संबंधित क्षेत्रातील सर्व बँकांचे (को-ऑपरेटीव्ह बँक व को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायट्या (पतपेढ्या) यांच्यासह ) ब्रँच मॅनेजर व मुख्य रोखपाल (हेड कॅशीअर)

सदर समितीने महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेलया संनियंत्रण समितीच्या नियंत्रणाखाली काम करावयाचे असून त्यांनी तालुक्यातील सर्व बँका (सहकारी बँकासह), पतपेढ्या, इ. ची समन्वय साधून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पैशाच्या व्यवहारावर लक्ष ठेवावयाचे आहे.

**९. संनियंत्रण समिती व त्याअंतर्गत तहसिलदार समिती यांनी करावयाची कार्यवाही -**

९.१ संनियंत्रण समिती व त्याअंतर्गत तहसिलदार समिती यांनी आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करून योग्य ती कार्यवाही करावी, उदा:-

(i) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या, मद्य (Liquor), पैसा इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) प्रत्येक उमेदवार व राजकीय पक्ष यांनी खर्चाबाबतची व्यवस्थित माहिती वेळेवर सादर करणे. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/२०१६/उनिख/ प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दिनांक १५/१०/२०१६).

(v) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(vi) अशा सर्व व्यवहार व हालचालींवर जसे तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचेवर लक्ष ठेवणे.

(vii) **बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे:-** निवडणुकांमध्ये गैरव्यवहाराकरिता वापरण्यात येणारा पैसा हा

सहकारी बँका तसेच पतपेढ्यांमार्फत जास्त प्रमाणात उपलब्ध होतो. यावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वेळीच योग्य ती कार्यवाही करावी.

(viii) आयोगाचे आदेश क्र.रानिआ / मनपा-२००९ / प्र.क्र.१ / का-५, दि.१६/०१/२०१२ प्रमाणे पेड न्यूज, पेड सोशल कमिटी, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

९.२ **यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना.उदा. :-**

(i) **व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**-(Video Surveillance Team)

आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचार फेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेचा भंग होईल अशा घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे.

अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करून द्यावी. एखादया प्रकरणी व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक-(Video Surveillance Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे चित्रिकरण करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना संबंधित क्लीपसह अहवाल सादर करावा. या क्लिप तपासणीसाठी Video Viewing Team ठेवावी.

(ii) **भरारी पथक** (Flying Squad)

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करून आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) **चेक पोस्टसाठी पथक** (Statistic Surveillance Team)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्य / शस्त्रांची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची / पैशांची वाहतूक होऊ शकते अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करून वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करून बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

(iv) **तक्रार निवारण कक्ष-**

आचारसंहिता भंगाची तक्रार स्विकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्याकरिता आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिका स्तरावर किंवा महानगरपालिकेच्या प्रशासकीय प्रभागाच्या स्तरावर कंट्रोल रुम / कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. या कंट्रोल रुममध्ये उपलब्ध असलेले दूरध्वनी / मोबाईल क्रमांक यांना योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(v) वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी सल्लामसलत करून योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा.- नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व शस्त्रधारी पोलीस, इत्यादी. तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करून द्यावी.

**१०. मतदार जनजागृती आणि शिक्षण (Education & Voters awareness)**

१०.१ मा.सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील अपिल क्र. ७१७८/२००१ दि. २ मे, २००२ च्या आदेशानुसार उमेदवारांची माहिती मतदारांना असणे हा मतदारांचा हक्क असल्याबाबत निर्वाळा दिलेला आहे. त्या अनुषंगाने उमेदवाराकडून त्याच्या शैक्षणिक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत शपथपत्र घेण्यात येते. याबाबतचे आयोगाचे

सुधारीत आदेश क्र. रानिआ /मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५, दि. १३ ऑगस्ट, २०१८ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात प्राप्त होणाऱ्या शपथपत्रास खालीलप्रमाणे प्रसिध्दी देण्यात यावी :-

i) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचना फलकावर
ii) संबंधित महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर
iii) स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरातीद्वारे
iv) प्रत्येक मतदान केंद्रासमोर दर्शनी भागावर म्हणजेच मतदार, मतदान केंद्राच्या खोलीत प्रवेश करतात त्या ठिकाणी किमान ३ फूट X ४ फूट इतक्या आकाराचा फ्लेक्स लावून सदर फ्लेक्सवरील अक्षरांचा आकार मतदारांना सहज वाचता येईल असा असावा. यासंदर्भात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्राचा संगणकीय प्रणालीमधून प्राप्त होणाऱ्या गोषवाऱ्याचा नमुना सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये जोडला आहे.
v) तसेच प्रत्येक प्रभागामध्ये नागरिकांना सहजरित्या वाचता येईल अशा रितीने ठळक मोक्याच्या ठिकाणी मतदानाच्या ३ दिवस आधी फ्लेक्स अथवा फलक लावून प्रसिध्दी द्यावी.

१०.२ अंतिमत: निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या पूर्वसंमतीने त्यांच्याबद्दलची माहिती त्यांच्याच शब्दात सांगणारे २/३ मिनीटांचे व्हिडीओ बाईटस् स्वयंसेवी संस्था घेऊ शकतील व त्यांच्या संकेतस्थळावर ठेवू शकतील. सदर व्हिडीओ बाईटस् महानगरपालिकेने घेऊ नयेत. तसेच त्यांच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येऊ नयेत. याबाबत सर्व बाबी करताना उमेदवारांना समान संधी व न्याय्य तत्वाने वागणूक दिली जाईल याची दक्षता घ्यावी.

११. निरीक्षक

११.१ निवडणूक निरीक्षक :-

निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य निवडणूक निरीक्षक / निवडणूक निरीक्षक इ. नेमण्यात येणार आहेत. निर्भय, मुक्त व

पारदर्शक निवडणुकांसाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्थेबरोबर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश इत्यादी कामांवर त्यांनी लक्ष ठेवावयाचे आहे.

११.२ **आयकर निरीक्षक :-**

ज्या प्रभागात चुरस असेल, त्या प्रभागातील उमेदवारांनी केलेल्या निवडणूक खर्चावर लक्ष ठेवण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाकडून आयकर निरीक्षक नेमण्यात येणार आहेत असे आयकर अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर त्यांना विशिष्ट प्रभाग नेमून देण्यात यावेत. VST, FS, SST यांच्या मदतीने त्यांनी अशा विशिष्ट उमेदवारांच्या खर्चावर देखरेख ठेवावयाची आहे. त्यांना भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांच्या आधारे कार्यवाही करण्यासाठी प्रशिक्षण व सूचना पुस्तिका देण्यात याव्यात.

Video Surveillance Team व Video Viewing Team या दोन्ही टीम उमेदवार करीत असलेल्या अधिकच्या खर्चाबाबतचे पुरावे तयार करण्याचे असते. त्यामुळे या टिममधील कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी या टीममधील कर्मचारी वर्ग त्याप्रमाणे लेखाधिकारी व इतर तत्सम अधिकारी यांना उमेदवार करीत असलेल्या अधिकच्या खर्चाच्या बाबी व त्या सर्व बाबींची शॅडो रजिस्टरमध्ये करावयाचा समावेश या व इतर बाबींवर योग्य प्रशिक्षण व सूचना पुस्तिका देण्यात याव्यात.

१२. **निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत:-**

(i) राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या निवडणूक कार्यक्रम देण्यात येईल. त्यानंतर आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती-

(अ) महानगरपालिकांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी तसेच

(ब) राज्य निवडणूक आयोगास महाऑनलाईनचे सॉफ्टवेअर, मोबाईल ॲप्स, फॅक्स व ई-मेलद्वारे तात्काळ पाठवावी.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्रांचा ताबा घेणे, मतदान यंत्रांवर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी. यासंदर्भातील आयोगाचे दि.२४/१०/२०१६ व दि. ०९/११/२०१६ चे आदेश पहावेत.

(v) **निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत:-**

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधित अधिनियम / निवडणूक नियमातील तरतुदीनुसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

१३. इतर

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

"…. The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party, howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party, howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be

able to secure an advantage over others by virtue of its superior financial strength...

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions... The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country..."

(ii) हे सर्व लक्षात घेता सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कोणत्याही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षाबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(ii) ह्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत.

१४. **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे महानगरपालिका आयुक्त व इतर सर्व संबंधित अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-**

(अ) श्री.एल.आर.शिवराम गौडा व इतर वि. टी.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र.४२७२/१९९१- "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत..."

(ब) श्री.एम.एस.गिल रिट याचिका १२९७/१९७७ - उद्भवलेली अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेशा" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार. (आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र.१०/ .सं.क, दि. ०४/१०/२०१६)

(क) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६०६/१९९३ भारत सरकारविरुध्द एम.एस.गिल याप्रकरणी दि.२१/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दि.०२/०८/२००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र. ४/२००१/जेएस-२, दिनांक ०७/०२/२००१)

**१५. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक:-**

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहेत:-

फॅक्स क्रमांक :- ०२२-२२८४६७२१

दूरध्वनी क्रमांक:- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०

ई-मेल :- sec.mh@gov.in

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्रे :- परिशिष्ट १**

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित पोलीस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलीस दल उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-३३,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२
४. सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग
७. जिल्हाधिकारी धुळे व अहमदनगर
८. पोलीस अधिक्षक, धुळे व अहमदनगर

९. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.

त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिकांना आवश्यक साधनसामग्री विनाविलंब पुरवावी.

१०. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई -५१

११. सहायक आयुक्त, (संगणक कक्ष), राज्य निवडणूक आयोग,

त्यांना कळविण्यात येते की, संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून ई.व्ही.एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग व मार्कर पेनची मागणी प्राप्त करुन घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

१४. निवड नस्ती- का-५, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

परिशिष्ट-१

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र. ४४/का.५, दिनांक २८/०९/२०१८ सोबतचे सहपत्र

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०१८**

**निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीचा गोषवारा**

**प्रभाग क्र. व नाव (असल्यास) -**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता (कमाल) | जंगम मालमत्ता एकूण रुपये (रु.लाखात) | स्थावर मालमत्ता एकूण रुपये (रु.लाखात) | दायित्वे/थकीत रकमा (रु.लाखात) | गुन्हेगारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणाची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणाची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

| | |
|---|---|
| Disclaimer (अस्वीकरण) | १) सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१ (युनियन ऑफ इंडिया वि. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक रिफॉर्म व इतर) मधील दि.२ मे, २००२ च्या न्यायालयीन निर्णयाच्या आधारे |
| | २) वरील गोषवारा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्रामध्ये दिलेल्या माहितीच्याआधारे देण्यात आला आहे. |
| | ३) उमेदवारांच्या मूळ शपथपत्राची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनाफलकावर / संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| | ४) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रातील माहिती चुकीची आहे असे प्रतिस्पर्धी उमेदवारास वाटत असल्यास त्याबाबत शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करता येते. |

दिनांक:-

निवडणूक निर्णय अधिकारी-------- महानगरपालिका

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.४४/का.५,
दि. २८ सप्टेंबर, २०१८ सोबतचे सहपत्र.

## आदर्श मतदान केंद्र- त्रयस्थ संस्थेद्वारे मतदान केंद्राची तपासणी करणेची प्रश्नावली.

होय/नाही

१) मतदान केंद्र असलेली इमारत कायम स्वरुपी बांधकाम असलेली आहे का ?

२) मतदान केंद्र तात्पुरत्या स्वरुपात म्हणजेच तंबू, पत्र्याचे शेड, इत्यादी स्वरुपात आहे का ?

३) मतदान केंद्रे खाजगी मालकी असलेल्या इमारतीत आहे का ?

४) मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास आजुबाजुच्या परिसरात शासकीय इमारत आहे का ?

५) मतदान केंद्र (बहुमजली इमारत असेल तर) तळमजल्यावर आहे का?

६) मतदान केंद्र प्रभागातील मध्यवर्ती ठिकाणी आहे का?

७) मतदान केंद्र वरच्या मजल्यावर असल्यास लिफ्टची व्यवस्था आहे का?

८) मतदान केंद्र असलेल्या इमारतीपर्यंत पोहचण्याचा मार्ग अरुंद (बोळीतला) आहे का ?

९) मतदान केंद्र असलेल्या इमारतीमध्ये ४ पेक्षा जास्त मतदान केंद्र स्थापन करण्यात आली आहेत का ?

१०) मतदान केंद्र असलेली इमारत परिसरातील नागरिक व मतदार यांना परिचित व सुलभरित्या शोधता येईल अशी आहे का ?

११) मतदान केंद्र असलेल्या इमारतीत किंवा १०० मीटर परिसरात धार्मिक स्थळ आहे का ?

१२) मतदान केंद्र इमारत सुस्थितीत व सर्व ऋतुंमध्ये मतदानाच्या कामकाजासाठी वापरण्यायोग्य आहे का?

१३) मतदान केंद्राच्या खोलीचे क्षेत्रफळ अंदाजे किमान २०० चौ.फूट आहे का?

१४) आत जाणे व बाहेर येणे याकरीता स्वतंत्र दरवाजे आहेत का?

१५) मतदान केंद्राच्या खोलीत विद्युत व्यवस्था कार्यान्वित आहे का ?

१६) मतदान केंद्रावर फर्स्ट एड बॉक्स (प्रथमोपचार पेटी) ची व्यवस्था आहे का ?

१७) मतदान केंद्रावर मतदारांच्या संख्येशी सुसंगत मतदान अधिकारी / कर्मचारी आहेत का ?

१८) मतदान केंद्रावर मतदान सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून पुरेसा पोलीस बंदोबस्त आहे का ?

१९) मतदान केंद्राबाहेर २०० मी. परिसरात आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या बाबी जसे - प्रचार फलक,पक्ष कार्यालय, प्रचार कार्यालय, प्रचार चिन्ह असलेल्या वस्तू, प्रतिनिधींचे कार्यालय आहे का ?

२०) मतदान केंद्र असलेल्या खोलीत खिडकीतून मतदान केंद्राची प्रक्रिया दिसून गोपनीयतेचा भंग होत आहे का ?

२१) मतदान केंद्रात मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे मतदान केंद्रातील माहिती बाहेर जाईल अशी कुठलीही कृती होत आहे का ?

२२) मतदान केंद्रावर कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट यामधील केबलमुळे मतदारांना प्रवेश व बाहेर निघण्यामध्ये अडचण / अडथळा निर्माण होत आहे का ?

२३) मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याइतपत फर्निचर ( टेबल, खुर्च्या, बाकडे) उपलब्ध आहे का ?

२४) मतदान केंद्राबाहेर दर्शनी भागावर आवश्यक सूचना, फलक, उमेदवाराविषयी आयोगाने विहित करुन दिलेली माहिती याबद्दलचे फलक लागले आहेत का ?

२५) मतदान केंद्रावर ठळक ठिकाणी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी, इत्यादीबाबतची माहिती देणारे फ्लेक्स लावण्यात आले आहेत का?

२६) मतदान केंद्रात पुरेसा प्रकाश आहे का व मतदान केंद्र हवेशीर आहे का ?

२७) मतदान केंद्रावर अपंग मतदारांसाठी रॅम्पची व्यवस्था आहे का?

२८) मतदान केंद्र वरच्या मजल्यावर असल्यास व लिफ्टची व्यवस्था नसल्यास डोलीची व्यवस्था करण्यात आली आहे का?

२९) मतदान केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे का ?

३०) मतदान केंद्रामध्ये स्त्री व पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था आहे का?

३१) प्रसाधनगृहामध्ये वापरासाठी नळाद्वारे वाहत्या पाण्याची (running water) व्यवस्था आहे का ?

३२) मतदान केंद्र असलेल्या इमारतीच्या प्रवेशदाराजवळ मतदार सहाय्य केंद्र स्थापन करण्यात आले आहे का?

३३) मतदार रांगेत उभे असताना त्यांचे पावसापासून संरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे का?

---------